नि.दि.वा.क्र. २३/२०१४
शशिकला वि. जगदीश + १
**CNR No. MHWS090002402014**

**निशाणी क्र. १ खालील आदेश**
**(दिनांक २७ जून, २०१९ रोजी घोषीत)**

१. सदरचा दावा हा वादी हिने घोषणा करून कायमचा मनाई हुकूम मिळण्याबाबत दाखल केला आहे. सदर दावा दिनांक ०८.०७.२०१४ रोजी दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी दिनांक १३. ०७.२०१५ रोजी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला आहे.

२. सदर दाव्याचे संपूर्ण अवलोकन केले असता तसेच रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी हे सन २०१७ पासून सतत गैरहजर आहेत. माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र. ४१ खाली दिनांक ०५.१०.२०१७ रोजी मुद्दे निश्चित केलेले आहेत. त्यानंतर सदर प्रकरण वादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आले.

३. सदर प्रकरण वादीच्या पुराव्याकरीता दिनांक २२.११.२०१७ पासून नेमण्यात आलेले आहे. परंतु तेव्हापासून आजपर्यंत वादी हे प्रकरणात कधीही हजर झालेले नाहीत व त्यांनी आपला पुरावा दाखल केलेला नाही. वादीला वारंवार संधी देवूनही वादीने प्रकरणात आपला पुरावा दाखल केलेला नाही.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी दिनांक १९.०९.२०१८, २९.११.२०१८, ०४. ०१.२०१९ आणि १४.०३.२०१९ रोजी आदेश पारीत करून वादी हे गैरहजर असल्यामुळे व त्यांनी कुठलाही पुरावा दाखल न केल्यामुळे प्रकरण खारीज करण्याच्या आदेशासाठी नेमलेले होते. वादीतर्फे त्यांच्या विधीज्ञांनी दिनांक १७. १२.२०१८ रोजी पुरावा दाखल करण्यासाठी वेळ मिळणेबाबत दाखल केलेला अर्ज माझे विद्यमान पुर्वाधिकारी यांनी नामंजूर केलेला आहे. त्यानंतरही वादीतर्फे विधीज्ञांनी दिनांक ०७.०१.२०१९, २९.०४.२०१९ रोजी पुरावा दाखल करण्यासाठी दाखल केलेले अर्ज नामंजूर केलेले आहेत. दिनांक ११.१०.२०१८ रोजी पुरावा दाखल करण्यासाठी वेळ मिळण्याबाबत वादीतर्फे वकीलांनी केलेला

अर्ज रू. २००/— खर्चासह मंजूर करण्यात आला होता. परंतु वादीने सदर आदेशाची पुर्तता केलेली नाही.

५. एकंदरीत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीला सदर दावा चालविण्यास स्वारस्य राहिलेले नाही. सदर प्रकरण जुने म्हणजे सन २०१४ चे आहे. वादीला वारंवार संधी देवूनही वादीने स्वत: अथवा तिच्यामार्फत इतर कोणाचाही पुरावा दाखल केलेला नाही. यावरून वादीला सदर प्रकरण पुढे चालवायचे नाही हे स्पष्ट होते. तसेच वादीने प्रकरण पुढे चालविण्यात कसूर केल्यामुळे सदर दावा खारीज होण्यास पात्र आहे. करिता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. सदर दाव्यात वादीने पुरावा दाखल करण्यास कसूर केल्यामुळे तसेच सदर दावा पुढे चालविण्यासाठी पुढील कार्यवाही न केल्यामुळे दावा खारीज करण्यात येतो.

२. दोन्ही पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.

स्वाक्षरी/—
( सु. ह. वानखडे )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
मानोरा.

दिनांक : २७.०६.२०१९

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Junior Stenographer | :- | Devendra V. Daware **(Steno-Cum-Clerk)** |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Manora. Dist. Washim. |
| Date | :- | 27/06/2019 |
| Order signed by the presiding officer on | :- | 27/06/2019 |
| Order uploaded on | :- | 27/06/2019 |